**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संतोष सुभाष मुणगेकर

माझे वय – ३५ वर्षे,

व्यवसाय – गवंडीकाम

रा. – रेवंडी, मधलीवाडी, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एच.टी.चव्हाण यांचे मार्फत.**

०१. दि.०४/११/२०२१ रोजी मी माझ्या घरी होतो. सदर दिवशी माझ्या बहिणीला माझ्या भावोजींनी मारहाण केली होती. त्याबाबत माझ्या बहिणीने मला फोनवरुन माहिती दिली होती, त्यामुळे मी त्याठिकाणी गेलो होतो. मी व माझ्या बहिणीने पोलीस स्टेशनला जावून तक्रार केली होती. त्यानंतर पोलीस तेथे आले होते. घराच्या हॉलमध्ये मारामारी झाली होती. सदरची जागा माझ्या बहिणीने दाखवली होती. त्याठिकाणी एक काठी होती. सदरची काठी पोलिसांनी जप्त केली होती. सदरची काठी मारहाणीच्यावेळेस माझ्या बहिणीने ओढून घेतली होती, त्यामुळे त्याचे दोन तुकडे झाले होते. माझ्या समक्ष पोलिसांनी पंचनामा केला होता. मला आता घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. सदरचा पंचनामा माझ्या समक्ष झाला आहे. त्यावर अ.क्र.२ ला माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी२/पी.डब्ल्यू २** दिली आहे. मला जप्त केलेली काठी दाखविल्यास मी ओळखू शकणार नाही. मला आरोपी दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री एस.के.जाधव यांचे मार्फत.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझी सख्खी बहीण असून माझे तिच्याशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी भाची कोमल व कावेरी यांच्या शिक्षणाचा

खर्च मी केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला कथीत घटनास्थळाचा सर्वे नंबर, हिस्सा नंबर अथवा घर नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळावरील घरामध्ये माझी बहीण राहत होती ही बाब दर्शविणारा कुठलाही कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही, तसेच, तसा दर्शविणारा कुठलाही पुरावा माझ्या बहिणीकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या आजुबाजूला हाकेच्या अंतरावरती इतर लोकांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिसांना पंचनाम्यातील मजकूर सांगितला व त्याप्रमाणे पोलिसांनी लिहीला असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पेडणेकर पोलीस यांची माझी घटनेच्या अगोदरपासून ओळख होती.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या बहीणीने पोलिसांकडे तक्रार केली होती, त्यानंतर पोलीस तेथे आले होते, पोलिसांनी त्याठिकाणावरुन काठी जप्त करुन पंचनामा केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हॉलमध्ये मारामारी झाली होती, माझ्या बहिणीने जागा दाखवली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी बहीण असल्याने तिला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळावर मी कधीही गेलो नव्हतो, मी पंचनाम्यावरती पोलीस स्टेशनला सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, समीर निवतकर हा आमच्या गावातील राहणारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या पुर्वी माझ्या बहिणीचे समीर निवतकर याच्याशी प्रेमसंबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी सुध्दा माझी बहीण व समीर निवतकर भेटत असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

ठिकाण : मालवण
दिनांक : ०२/०१/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण